# गोदावरीतील विसर्ग १५,७७५ क्यूसेकवर

## दारणा, गंगापूरच्या पाणलोटात हलक्या सरी

**राहाता | प्रतिनिधी**

दारणा, गंगापूरच्या पाणलोटात काल दिवसभर सुरू असलेल्या पावसाच्या हलक्या सरींमुळे गोदावरीत काल सायंकाळी १५ हजार ७७५ क्यूसेक वेगाने विसर्ग सुरू होता.

नवीन पाण्याचे आगमन काहीसे कमी झाल्याने दारणा धरणाचा विसर्ग ३,५३६ क्यूसेकवर आहे. पाण्याची आवक घटल्याने गंगापूरचा विसर्ग १,७६० क्यूसेकवर स्थिर ठेवण्यात आला आहे.

काल सकाळपर्यंत दारणा धरणात २६१ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली. १ जूनपासून या धरणात ४ टीएमसी पाणी नव्याने दाखल झाले आहे. दारणा समूहातील भावली धरण ७६.२२ टक्के, वाकी ५७.६६ टक्के, भाम धरण ५७.८३ टक्के भरले आहे.

काल सायंकाळी ६ वाजता गंगापूर धरणातून १,७६० क्यूसेकने विसर्ग सुरू होता. गंगापूर समूहातील गंगापूरमध्ये ५९.०१ टक्के, कश्यपीत ५३.८३ टक्के, गौतमी गोदावरीत ३६.६७ टक्के, मुकणे ५१.११ टक्के, वालदेवी ५६.५८ टक्के, कडवा ४७.१० टक्के, आळंदी ४७.०६ टक्के, भोजापूर ८१.७२ टक्के, पालखेड ६६ टक्के असा साठा आहे. दारणा ३,५३६, गंगापूर १,७६०, कडवा ७९५, पालखेड ४,३३८ क्यूसेकने धरणातून पाण्याची आवक सुरू असल्याने नांदूरमधमेश्वर बंधाऱ्यातून जायकवाडीच्या दिशेने गोदावरीत १५,७७५ क्यूसेकने विसर्ग सुरू होता. काल सकाळी ६ वाजेपर्यंत या बंधाऱ्यातून गोदावरीत जायकवाडीच्या दिशेने ७.७ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.

### आजचे कार्यक्रम

✲ गझल मैफल
विश्वास ग्रुप व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा जलालपूर, नाशिकतर्फे गझल मैफल.
स्थळ : विश्वास हब, ठाकूर रेसिडेन्सी, विश्वास को-ऑप. बँकेसमोर, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक.
वेळ : सायंकाळी ६ वाजता.
निमंत्रित गझलकार - अनिता बोडके, यशश्री रहाळकर, अतुल देशपांडे, गोरख पालवे, सीमा ताडगे, विशाल टर्ले.

# मुख्यमंत्र्यांनी टोचले बेताल लोणीकरांचे कान

**मुंबई | प्रतिनिधी**

सर्वसामान्य जनतेविषयी वादग्रस्त वक्तव्य करणारे भाजपचे माजीमंत्री बबनराव लोणीकर यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी कान टोचले. लोणीकर यांचे विधान चुकीचे असून अशी विधाने करणे योग्य नसल्याची समज त्यांना देण्यात येईल, असे फडणवीस यांनी गुरुवारी सांगितले.

लोणीकर यांनी एका कार्यक्रमात केलेल्या एका वक्तव्यावरुन नवा वाद निर्माण झाला आहे. त्यांच्या वक्तव्यावर विरोधकांकडून सडकून टीका केली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी त्यांना समज दिली आहे. याबाबत अधिक बोलताना फडणवीस म्हणाले की, बबनराव लोणीकरांचे विधान एकदम चुकीचे आहे. त्यांनी जरी काही लोकांना उद्देशून हे विधान केले असेल तरीही अशा प्रकारचे विधान करण्याचा अधिकार कोणालाही नाही.

देशाचे पंतप्रधान जेव्हा सांगतात की मी देशाचा प्रधान सेवक आहे आणि आम्ही सर्व जनतेचे सेवक आहोत तर आम्हाला मालक बनता येणार नाही. त्यामुळे बबनराव लोणीकर यांचे जे वक्तव्य टीव्हीवर आले आहे ते पूर्णपणे चुकीचे आहे. अशा प्रकारचे वक्तव्य करणे योग्य नाही. तशी समज बबनराव लोणीकर यांना देण्यात येईल, असेही फडणवीस म्हणाले.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही लोणीकर यांना सुनावले आहे. पक्षाच्या कुठल्याही कार्यकर्त्याला, कुठल्याही नेत्याला, कुठल्याही आमदाराला, कुठल्याही खासदाराला, जनप्रतिनिधींना बबनराव लोणीकर ज्या पद्धतीने बोलले त्या पद्धतीने बोलायचा अधिकार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

### बबनराव लोणीकर काय म्हणाले?

सोशल मीडियावर चार-पाच कार्टी असतात, त्यांचा मायचा पगार बबनराव लोणीकरने केला. त्याच्या बापाचे पेन्शन बबनराव लोणीकरने केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ६ हजार रुपये तुझ्या बापाला पेरणीला दिले. तुझ्या आई, बहीण आणि पत्नीला लाडकी बहीण योजनेतून पैसे दिले. तुझ्या अंगावरचे कपडे आमच्या सरकारचे आणि तुझ्या पायावरची चप्पल आमच्यामुळेच. हातातले ते मोबाईलचे डबडं आमच्यामुळे. त्यामुळे आमचेच घेतो आणि आमच्यावरच तंगड्या वर करतो, असे वादग्रस्त वक्तव्य लोणीकर यांनी केले आहे.

### स्थानिक भाव

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | ९७,३०० |
| २२ कॅरेट | ८९,५२० |
| चांदी (प्रति किलो) | |
| १०८००० | |

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८३७५६ |
| | (+१०००) |
| निफ्टी | २५५४९ |
| | (+३०४) |

### बाजार भाव

**कालचे कांदा भाव**

| | आवक (क्विं.) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|---|
| लासलगाव | १६५२५ | ६०० | २१११ | १५७० |
| विंचूर | १२६६३ | ५०० | १९११ | १५८० |
| निफाड | ४९७६ | ६०० | १८११ | १५५० |
| सायखेडा | १४८० | ८०० | १९०१ | १५७५ |
| पिंपळगाव | १७८०० | ७०० | २२०१ | १५५० |

# सरासरी कांदा दर स्थिर

**नाशिक | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्रमुख कांदा लिलाव होणाऱ्या लासलगाव, पिंपळगाव, उमराणे, विंचूर, निफाड, अंदरसूल, वणी आदी बाजार समिती, उपआवारांमध्ये कांद्याची आवक टिकून आहे. मात्र कांदा ओला असल्याने दर किंचित स्थिरावले आहे. किमान आणि कमाल दरात चढ उतार होत असले तरी सरासरी कांदा दर मात्र १,५०० ते १,६०० रुपये प्रतिक्विंटल दर अशा स्तरावर आहे. या दराच्या कांद्याचे वाहने सर्वबाजारात अधिक प्रमाणात आहेत. त्यामुळे आवक अधिक आहे.

# पालेभाज्यांची अत्यल्प आवक

**नाशिक | प्रतिनिधी**

नाशिक बाजार समितीच्या आवारात दोन दिवसांपासून पालक, मेथी, शेपू, कांदापात आणि कोथिंबीर आदी पालेभाज्यांची आवक अत्यल्प होत आहे. पावसाने झोडपल्याने भाज्याची टिकवण क्षमता कमालीची घटली आहे, त्यामुळे परपेठेत मागणी घसरली आहे. त्यामुळे स्थानिक भाजीबाजारातच या मालाची सर्वाधिक विक्री होत आहे. मात्र मागणीच्या प्रमाणात पुरवठा नसल्याचे चित्र कायम आहे. त्यामुळे भाज्यांचे दर गगनाला भिडलेले आहेत. कोथिंबिर गावठी साडे सात हजार जुडी आवक झालेली होती. मेथी ६४०० जुडी, शेपू ५८०० जुडी, कांदापात ५५०० हजार जुडी विक्रीस आलेली होती.

# अपेक्षांचे जड झाले ओझे...

(पान १ वरून) मुलांनी काय करावे? मुलीची क्षमता, तिच्या मनाचा कल, तिची अभिरुची, कौशल्ये, तिला त्या क्षेत्राची आवड आहे? असे कोणतेही प्रश्न त्यांनाच नव्हे तर इतर पालकांनाही पडू नयेत? मुलांच्या भविष्याची दिशा निश्चित करताना मुलांना विश्वासात घेण्याचा प्रयत्न बहुसंख्य पालक करत नाहीत. उलट मुलांनी फक्त भरपूर गुण मिळवावेत, असेच मुलांच्या मनावर बिंबवण्यासाठी त्यांची धडपड सुरू असते. त्याअर्थाने मुलांना गुणांचे यंत्र बनवत आहोत, याची जाणीव अभावानेच आढळते. शिक्षणाचा मूळ हेतू हरवला की, अशी जीवघेणी गुंतागुंत निर्माण होते. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबरोबरच शारीरिक, भावनिक, मानसिक, सामाजिक विकास करते आणि त्यांना माणूस बनवते ते शिक्षण, अशी शिक्षणाची ढोबळ व्याख्या होऊ शकेल. किती पालकांना मुलांच्या अशा समग्र विकासात रस असतो? दुसरीकडे ठोस शैक्षणिक धोरणाचा सार्वकालिक अभाव आहे. पुस्तके, गणवेश, परीक्षा, पोषण आहार यात सातत्याने बदल केला जातो. त्याचाही ताण येतोच. समाजातील अनेक मुलांचा विशिष्ट दिशेने कल आढळतो म्हणून त्यांच्याही मुलांनी त्याच दिशेने जावे, असा बहुसंख्य पालकांचा आग्रह असतो. त्यासाठी ते पाण्यासारखा पैसा खर्च करण्यास तयार असतात. मुलांनी फक्त त्यांचे स्वप्न पूर्ण करावे हाच हेतू असतो. त्यांचा हाच अट्टाहास मुलांची मेंढरे बनवतो. डोळ्यांना पालकांच्या अपेक्षांची झापडे लावलेली मुले पालकांनी ठरवलेल्या मार्गावर चालण्याचा पुरेपूर प्रयत्न करतात. तथापि वर उल्लेखित मुलीसारखे थकले-भागलेले अनेक कोवळे जीव त्यांच्याही नकळत आत्महत्या करतात. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या ही जटिल समस्या बनत आहे. पालक मुलांना त्यांच्या काळजाचा तुकडा मानतात. तसे वारंवार बोलूनही दाखवतात, पण याच मुलांना आयुष्यात काय बनायला आवडेल यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्याची गरज शिक्षित पालकांनाही वाटत नाही. किंबहुना, मुलांना काय कळते, असा भ्रम असतो. त्यांचा हाच भ्रम मुलांचे बालपण हिरावून घेतो. त्यातून अडनिड्या वयातील अकाली पानगळ मात्र सुरूच राहते.

# राज यांचा ५ जुलैला मोर्चा

(पान १ वरून) प्रेम करणाऱ्या सगळयांनी या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे.मोर्चात कोण सहभागी होणार आणि होणार नाही हे मी पाहणार आहे. या मोर्चात उद्धव ठाकरे यांनीही सहभागी व्हावे यासाठी मी त्यांच्यासोबतही बोलेन, असेही राज ठाकरे म्हणाले. गेल्या काही दिवसांपासून राज आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याच्या बातम्या सुरू आहेत. त्यामुळे या मोर्चाच्या निमित्ताने राज-उद्धव एकत्र येणार का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी माझ्याशी चर्चा केली. पण काही प्रश्नांची उत्तरे भुसेंकडे नव्हती. हा एक कट आहे. माझा विरोध काल होता,आज आहे आणि कायम राहणार. हिंदी किंवा इतर कोणत्याही भाषेची सक्ती महाराष्ट्रात होऊ देणार नसल्याचे सांगताना राज ठाकरे म्हणाले, मी हिंदी सक्तीचा विरोध करण्यासाठी येत्या ५ जुलै रोजी गिरगाव चौपाटी ते आझाद मैदान असा मोर्चा काढणार आहे. या मोर्चात कोणत्याही पक्षाचा झेंडा नसेल. तो मोर्चा मराठी माणसाचा असेल, मोर्चाचे नेतृत्व मराठी माणूसच करेल. शिक्षणतज्ज्ञ,भाषातज्ज्ञ, साहित्यिक यांच्याशी बोलणार आहे.

# उद्धव यांचे ७ जुलैला धरणे

(पान १ वरून) मैदानात होणाऱ्या आंदोलनात स्वतः उद्धव ठाकरे उतरणार आहेत. सर्व महाराष्ट्राने या आंदोलनात उतरावे, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी यावेळी केले आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेत इयत्ता पहिलीपासून तृतीय भाषेचा समावेश करून हिंदी सक्तीची करण्याच्या विरोधात मराठी अभ्यास केंद्र समन्वय समिती मैदानात उतरली आहे. या समितीने आज उद्धव ठाकरे यांची मातोश्री येथे भेट घेतली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. तमाम मराठी माणसांनी पक्षीय भेदाभेद विसरून या लढ्यात सामील व्हावे,असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी यावेळी केले. हिंदीच्या सक्तीबद्दल आपण शिक्षणमंत्र्यांना आता आझाद मैदानावरच भेटू, असेही ते म्हणाले.

# नाशिककरांवर दुहेरी टोलधाड

(पान १ वरून) नाका, आणि नंतर समृद्धी महामार्गाचा टोल भरतात. त्यामुळे प्रवाशांना एकाच प्रवासात दुहेरी टोलचा भुर्दंड बसतो. अनेक वाहनधारक, विशेषतः उद्योगधंद्यासाठी प्रवास करणारे व्यावसायिक यामुळे त्रस्त झाले असून त्यांनी सातत्याने 'एक टोल माफ करा' अशी मागणी विविध पातळ्यांवरून केली आहे. नाशिक शहर समृद्धी महामार्गाशी भरवीर मार्गातून जोडले जाणार होते. या मार्गासाठी भूमी अधिग्रहणही पूर्ण झाले असून शेतकऱ्यांना भरपाई मिळालेली आहे. तथापि, या मार्गाचे प्रत्यक्ष बांधकाम अद्याप सुरू झालेले नाही..सध्या या मार्गावर एक सिंगल टायरचा डांबरी रस्ता आहे, जो अरुंद असून वाहनांच्या सुरक्षित व वेगवान प्रवासासाठी योग्य नाही. त्यामुळे वाहनधारकांना हा मार्ग टाळावा लागतो आणि पर्यायी मार्गांचा वापर करतानाच दुहेरी टोल भरावा लागतो.या प्रश्नामुळे नाशिकच्या औद्योगिक क्षेत्रालाही मोठा फटका बसतो आहे. नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन (निमा) आणि अंबड इंडस्ट्रीयल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (आयमा) या प्रमुख उद्योग संघटनांनी या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. या दुहेरी टोलची गंभीर दखल घेत शिक्षक आमदार सत्यजित तांबे यांनी नाशिकचे जिल्हाधिकारी यांची भेट घेतली आणि या मुद्द्यावर चर्चा करत तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली. नागरिकांच्या आर्थिक हिताशी संबंधित असलेल्या या मुद्द्यावर प्रशासनाने वेळ न दवडता कृती केली पाहिजे, असे आमदार तांबे यांनी स्पष्ट केले.

# मारुती चितमपल्ली यांच्या स्मरणार्थ 'पर्यावरण मित्र' पुरस्कार



**नाशिक |** सोलापूरच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविलेले, नाशिकच्या १९८५ ला पार पडलेल्या सहाव्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे ते संमेलनाध्यक्ष ,वनाधिकारी म्हणून दीर्घकाळ नोकरी करीत तब्बल ६५ वर्षे जंगलात काढणारे अरण्यऋषीं मारुती चितमपल्ली यांचे सोलापूरमध्ये निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पक्षिमित्र संघटनतर्फे डिसुझा कॉलनी मधील प्रौढ मित्रमंडळ सभागृहात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शोकसभेत बोलताना नेचर क्लब ऑफ नाशिकचे अध्यक्ष प्रा.आनंद बोरा यांनी मारुती चितमपल्ली यांच्या स्मरणार्थ 'नेचर क्लब ऑफ नाशिक'च्या वतीने दरवर्षी वन विभागातील वन मजूर. गाईड, वन सेवक यांना 'पर्यावरण मित्र' पुरस्कार दिला जाणार असल्याची घोषणा केली. पक्षिमित्र डॉ.अनिल माळी यांनी मारुती चितमपल्ली यांच्या आठवणींना उजाळा दिला. अंजली जाखडी यांनी सूत्रसंचालन केले. पक्षिमित्र संघटनेचे अध्यक्ष मधुकर जगताप, किशोर चव्हाण, भगीरथ घोटेकर, लहू डफळे, उमेश कुमार नागरे, मनीष गोडबोले, संदीप रावळे, भगवान क्षेमकल्याणी, अनंत सरोदे, रवींद्र वामनाचार्य, संदीप सोनवणे, अनिल तुपे आदींसह पक्षिमित्र, साहित्यिक उपस्थित होते.

# 'यी नाशिक'चे योगा प्रशिक्षण

**नाशिक | प्रतिनिधी**

तरुण व्यावसायिकांसाठी एक गतिमान व्यासपीठ असलेल्या 'यी नाशिक'ने २० आणि २१ जून या दोन दिवसांत ७ ठिकाणी योगसत्रे आयोजित करीत फ्रावशी अकादमी आणि जिल्हा परिषद शाळांमधील एक हजार ३०० विद्यार्थ्यांसह अनेक साधकांना योगाचे धडे दिले.

फ्रावशी अकादमीच्या फ्रावशी टाऊन कॅम्पस व इतर ठिकाणी आयोजित या कार्यक्रमांमध्ये श्वेता चांडक आणि सुरभि तोष्णीवाल यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम पार पडला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल आणि फ्रावशी अकादमीचे रतन लथ यांचे या कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले. युवकांसाठी योग आणि आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी आमचा पुढाकार असल्याचे अध्यक्ष हर्ष देवधर यांनी सांगितले.



### योगशिबिर...



आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत पतंजली योगपीठाच्या वतीने अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन हरियाणातील कुरुक्षेत्र या ऐतिहासिक भूमीत साजरा करण्यात आला. याप्रसंगी योग प्रात्यक्षिक करताना बाबा रामदेव आणि उपस्थित अतिथी आदी.

# टोयोटा किर्लोस्कर - ओहमियमचा सामंजस्य करार

**नाशिक |** टोयोटा किर्लोस्कर मोटरने बंगळुरूस्थित ओहमियम इंटरनॅशनल या आघाडीच्या पीईएम हायड्रोजन तंत्रज्ञान कंपनीसोबत भारतात ग्रीन हायड्रोजनवर आधारित एकत्रित ऊर्जा उपायसह विकसित करण्यासाठी सामंजस्य करार केला. या कराराअंतर्गत भारतात ग्रीन हायड्रोजन आधारित उर्जेचा विकास केला जाणार आहे. या करारान्वये २०४७ पर्यंत ऊर्जा स्वावलंबन प्राप्त करण्याचे आणि २०७० पर्यंत नेट झिरो उत्सर्जन साध्य करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.


# युटीआयची फंडाची योजना

**मुंबई |** युटीआय व्हॅल्यू फंडाद्वारे ग्राहकांसाठी नवी योजना सुरू करण्यात आली आहे. पोर्टफोलिओ तयार करून दीर्घकालीन भांडवल वृद्धीची अपेक्षा असलेल्या इक्विटी गुंतवणुकदारांसाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. दीर्घकाळात पुरेसा परतावा हवा असणाऱ्यांसाठी देखील ही योजना चांगली असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले आहे. ज्यांचा मूळ व्यवसाय सुस्थितीत आहे या ग्राहकांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कंपनीकडून करण्यात आले आहे.

# सुपरटेक ईव्हीचा इश्यू आज होणार बंद

**नाशिक |** इलेक्ट्रिक वाहन बाजारपेठेतील नामांकित सुपरटेक ईव्ही लि. या कंपनीने दुचाकी आणि इलेक्ट्रिक तीनचाकी वाहनांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी एसएमई सार्वजनिक इश्यूद्वारे २९.९० कोटी रुपये भांडवल उभारणार आहे. त्यानुसार कंपनीचा इश्यू खुला झाला असून, आज (दि. २७) इश्यू बंद होणार आहे. कॉर्पोरेट मेकर्स कॅपिटल लि. हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर आहेत.

# शब्दकोड :२८७



**आडवे शब्द** : १) २५ डिसेंबरचा सण ३) श्रीमंती जाऊन गरीबी येणे (वा.प्र) ९) संरक्षक भिंत १०) पुष्कळ ११) वेतन १२) शव यात्रा १३) बरोबर आलेला फौज फाटा १६) भोपळा, काकडी इत्यादीचे काप काढून ते वाळवून आणि तळून केलेला रूचकर पदार्थ १७) विश्वास पाटील यांची गाजलेली एक कादंबरी १९) भांग पिणारा २१) जीभ २३) एक सुगंधी वनस्पती २४) डोंगर, किल्ला २५) शिल्लक राहिलेली रक्कम २६) माझा २८) ज्वारीची वाळलेली खूंटे ३०) श्रीयूत ३२) पैंजण ३३) विक्रम ३६) चक्रवर्ती, राजगोपालाचारी यांचे प्रचलीत नाव ३७) अभिनेत्री ३८) केलेच्या प्रदर्शनाचे दालन ४१) देऊळ ४२) फायदा ४४) एकाग्र नजर ४६) आपला नसलेला ४८) आकडे मोडीचे शास्त्र ५०) झोंबणारे ५३) अतिशय मोठे, त्रासदायक ५४) सरळ मोठा वासा ५५) मान खाली घातलेला ५७) गाणे म्हणणारा ५९) पोट आणि गुडघा यांच्या साह्याने पुढे सरकणे ६०) घराचा मागचा दरवाजा ६२) ढग ६३) करपलेला भाग ६४) कौसल्य पुत्र ६५) चरण ६६) पाताळात भोगाव्या लागाव्या लागणाऱ्या वेदना

**उभेशब्द** : १) नात्यातील व्यक्ती २) फुलांचा वाफा ३) योग्य, बरोबर ४) चिमटा ५) आनंदाचा विरस होणे ६) हात ७) खोडकर ८) भेकड १०) पोशाख १२) मंगळवारी येणारी चतुर्थी १४) जास्वंद १५) धार्मिक आज्ञापत्र १६) पोळ १८) परक्यांचे आक्रमण २०) गर्द, दाट २२) विहीर २७) अतीशय तलम कापड प्रकार २८) दुर्योधनाचा जिवलग मित्र २९) पूर्वज ३१) प्राप्ती प्रमाणे ३२) पवित्र ३४) कमल नयन ३५) चिंतन ३८) कलावंत ३९) चटकन, त्वरीत ४०) उदर ४३) व शिवाय ४५) केर ४७) धोबी ४८) अर्थ संकल्प ४९) तात्काळ ५१) यथाशास्त्र ५२) अंधार ५६) स्तुती करण्या सारखे ५७) गीत ५८) कोळी, रेशीमाचा किडा ५९) घर ६०) वर्गातील विद्यार्थी संख्या ६१) किंमत, पैसा ६३) मज्जाव, बंदी

### शब्दकोड२८६चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भे | द | क | | स | र | स | री | त | | गा | व | प | डी | त |
| दा | र | व | ठा | | सा | र | | डा | ग | णे | | सा | र | ण |
| भा | | ठ | ण | क | | ब | र | ग | डी | | सो | य | | त |
| व | ग | | क | रा | म | त | | | मा | ग | | दा | भ | ण |
| | दा | स | | ल | | | का | र | ण | | ध | न | | क |
| आ | रो | ह | ण | | क | ल | मा | | से | ना | नी | | द | र |
| ब | ळ | | | सा | | ता | ला | | | ग | | पा | ळ | णे |
| दा | | ना | | व | र | | ये | न | | र | ण | र | ण | |
| र | जा | चा | ग | ज | क | र | णे | | कं | | | वा | व | डी |
| | मी | | म | | बा | | | भ | ड | क | णे | | ळ | |
| ज | न | मा | न | स | | स | म | र | | | | प | ण | जी |
| | दा | रा | | व | र्त | मा | न | भ | वि | ष्य | भू | त | | व |
| वा | र | | खं | ड | | न | | र | त | | त | न | म | न |
| त्र | | ना | डी | | पा | | ता | | र | स | द | | ग | दा |
| ट | ण | क | | आ | व | क | जा | व | क | | या | ग | | न |